श्री. स. भु. विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

सेंट्रल सेक्टर स्कॉलरशीप

महत्वाची सूचना.**(Revised Notice)**

सन २०२०-२१

दि. ०९.११.२०२०

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात बी.एस्सी प्रथम वर्गात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेंब्रुवारी २०२० मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक ( इयत्ता १२वी ) प्रमाणपत्र परिक्षेमध्ये विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना **भारत सरकार मार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना** राबविण्यात येत आहे. अशा विद्यार्थ्यांनी नविन मंजुरीचे (Fresh) आणि नूतनीकरणाचे (Renewal) चे अर्ज **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. तो अर्ज परिपूर्ण व अचूक भरून आवश्यक त्या कागदपत्रासोबत हार्डकॉपी कार्यालयात **खिडकी.कं.१ वर श्री. शेजुळे एस.एस.** यांच्याकडे **दि. ३०.११.२०२० पर्यंत सकाळी ११.०० ते २.००** या वेळेत आणून द्यावे. आवेदनपत्र सादर न केल्यास व शिष्यवृत्तीपासून वंचीत राहील्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील. याची सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी व मुदतीपूर्वी आवेदनपत्र सादर करावेत.

प्राचार्य

PRINCIPAL
S.B.E.S. College of Science
Aurangabad.

किमान पात्रता व अटी :-

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा, रहिवासी प्रमाणपत्र.
२. ज्या विद्यार्थ्याचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile merit list मध्ये सामावेश असेल,त्याच विद्यार्थ्याचे नवीन मंजूरी(Fresh)शिष्यवृतीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील.सदर विद्यार्थ्याची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
३. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा व मागील वर्षाच्या परिक्षेत किमान ५० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झालेला असावा.
४. अर्जदाराच्या पालकांचे सन २०१९-२० वार्षिक उत्पन्नाचा मुळ (Original) दाखला , उत्पन्न रू.८.०० लाखापर्यंत असावे
५. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र ( फोटो )
६. उच्च माध्यमिक परीक्षा ( १२वी ) फेब्रु/मार्च २०२० गुणपत्रिकेची साक्षांकीत प्रत.
७. आधार कार्डची छायांकित प्रत
८. तथापी एखाद्या विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड नसेल तर त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आय.डी. स्लीप किंवा बॅंक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकीत प्रत, किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत, अथवा प्राचार्याचे सही शिक्का असलेले विद्यार्थ्यांच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र इत्यादीपैकी एका कागदपत्राची छायांकीत प्रत जोडावी.
९. बॅंक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकीत प्रत.
१०. विद्यार्थ्यांने नजीकच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत (Nationalise) बॅंकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे. तसेच हे खाते आधार कार्डशी संलग्न (link) करणे आवश्यक आहे.
११. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करून शिष्यवृत्ती मिळवली असेल तर ती शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.
१२. प्रवेशपावतीची सत्यप्रत.. **अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.**